दै. गोदातीर दि. 09/05/24

# सायबर पोलिसांच्या सतर्कतेमुळे तक्रारदाराचे ५० हजार रुपये न्यायालयाच्या आदेशाने परत

**नांदेड-** ऑनलाइन ५० हजार रुपये हॅक झाल्यानंतर सायबर पोलिसांनी तात्काळ सदर रक्कम सीज करून अखेर न्यायालयाच्या आदेशानंतर हॅकरनी पळविलेली ५० हजार रुपयाची रक्कम पीडीतास परत केली.



२८ डिसेंबर २०२३ रोजी अज्ञात व्यक्तीने तक्रारदार राजीव मिरजकर (वय ५९) यांच्या मोबाईलचा रिमोट ॲक्सेस घेवून त्यांचे इंटरनेटबँकींग मार्फत ५० हजार रुपये ऑनलाईन ट्रान्जेक्शन करून घेतले होते. तक्रारदार यांच्या मोबाईलवर ५० हजार रुपये डेबीट झाल्याचा एसएमएस येताच सदरचे ट्रान्जेक्शन आपण केले नसल्याचे त्यांना लक्षात आले व कुणीतरी आपली फसवणुक केल्याचे त्यांना समजले. त्यामूळे त्यांनी तात्काळ सायबर पोलीस ठाणे नांदेड येथे धाव घेतली. सायबर पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी लगेच तक्रारदार यांची तक्रार १९३० या सायबर क्राईम हेल्पलाईन नंबरवर रजिस्टर करून घेतली व सदरची तक्रार एनसीसीआरपी पोर्टलव्दारे स्वीकारून पुढील कार्यवाहीसाठी संबंधीत बँकेचे नोडल अधिकारी यांना पाठवली.

तसेच तक्रारदार यांना नांदेड ग्रामीण ठाण्यात तक्रार देण्याचे कळविले. त्यानंतर तक्रारदाराचे ५० हजार रुपये होल्ड झाले. तक्रारदार यांना त्यांचे मोबाइलवर ५० हजार रुपये होल्ड झाल्याचा मॅसेज आल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे पैसे परत मिळण्यासाठी न्याय दंडाधिकारी कोर्ट ७ वे यांच्या न्यायालयामध्ये सदर होल्ड झालेली रक्कम परत मिळवण्यासाठी विनंती अर्ज सादर केला. त्यानूसार न्यायलयाने नांदेड ग्रामीण व अर्जदाराची बँक व अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम गेलेली बँक यांचेशी खात्री करून तक्रारदार यांचे ५० हजार रुपये परत करण्याचेसंबंधित बँकेला आदेश दिले. त्यानुसार तक्रारदार यांना त्यांचे ऑनलाईन फसवणुक झालेले ५० हजार त्यांच्या बैंक खात्यात परत मिळाले.

सदरची कारवाई सायबरचे पोउपनि गजानन दळवी, अंमलदार काशिनाथ कारखेडे, नांदेड ग्रामीणचे हवालदार मारोती माने, सचिन गरड यांनी पार पाडली.

ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६
येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील. ईमेल: godateer@gmail.com, kesh
/ लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४